# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०७/०२/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### विश्वासघात

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत मौजा एमआयडीसी चौक बुटीबोरी येथे दिनांक ०९/०९/२०२१ ते दिनांक ०६/०२/२०२२ दरम्यान फिर्यादी नामे– हेमंत दिपक राउत वय २१ रा. विरसावरकर नगर बुटीबोरी व आरोपी नामे– शिरीष कोसारक, रा. बुटीबोरी हे दोघेही फोटोग्राफी चे काम करीत होते. आरोपीने फिर्यादीस त्याचा कॅनॉन कंपनीचा १३०० डी मॉडेलचा कॅमेरा किं. ३७,०००/–रु. चा काही दिवसासाठी मागीतला परंतु आजपावेतो परत केला नाही. फिर्यादीने आरोपीस फोन करुन कॅमेरा मागीतला परंतु आरोपीने उदया देतो असे म्हटले व आजपावेतो कॅमेरा परत केला नाही व आरोपीने आपला मोबाईल बंद करुन ठेवला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दानोडे मो.क्रं. ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

### फसवणुक

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०१ कि. मी. हनुमान नगर कन्हान येथे दिनांक ०२/०२/२०२२ चे १७.०० ते ०५/०२/२०२२ चे १०.००. दरम्यान फिर्यादी नामे– गणेश चंदुजी चिंचुलकर वय ४८ वर्ष, रा. हनुमान नगर कन्हान यांनी त्यांच्या एका खात्यामधुन दुसरा खाता कोटक बॅक नागपुरचे खात्या मध्ये गुगल पे व्दारे १७,०००/–रू. ट्रान्सपर केले असता सदर पैसे ट्रान्सपर झाले नाही. त्यामुळे फिर्यादीने गुगल नेटवर्क वर सर्चकरून एसबीआय चे कस्टमर केअर टोल फ्रि क्रमांकावर कॉल केला. तेव्हा त्यांनी फिर्यादीला सांगितले की, तुमचे पैसे ट्रान्सपर होतील. त्यानंतर त्यांनी फिर्यादीला सांगितले की, सदर अकाउन्ट मध्ये पैसे ट्रान्सपर होत नाही. तुम्ही दुसरे बॅकचे अकाउन्ट नंबर असेल तर सांगा. तेव्हा फिर्यादीने त्यांना त्यांची ची मुलीचे पंजाब नशॅनल बॅक शाखा कन्हान येथील खाते क्रमांक दिला. त्यानंतर फिर्यादीला अज्ञात आरोपीने फोन करून फिर्यादीला सांगितले की, 'मी एसबीआय कस्टमर केअर मधुन बोलत आहे' असे सांगितल्यावरून त्यांनी फिर्यादीला विचारलेली माहीती फिर्यादीनी त्यांना दिली. त्यानंतर फिर्यादीच्या मुलीच्या पंजाब नशॅनल बॅक खात्या मधुन टप्प्याने टप्प्याने एकुण १,२६,५३०/–रू. काढुन फिर्यादीची अज्ञात आरोपीने फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरूण सहारे मो.क्र. ९३०९५९२५१२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**